जीवनदायी आरोग्य योजना बंद करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन,**
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. जीआयो -२०१२/प्र.क्र. १३५/आरोग्य-६,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१३

वाचा :- १) शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. जीआयो-१०९७/ प्र.क्र.२४७/ आरोग्य-३, दि. ६ नोव्हेंबर, १९९७
२) शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.रागांयो-२०१०/प्र.क्र. २४०/ आरोग्य-६, मंत्रालय मुंबई-४०० ०३२, दि. ३१ मे, २०१३

**शासन निर्णय :-**

शासनाने दिनांक ६ नोव्हेंबर, १९९७ पासून राज्यातील दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना हृदयविकार, मुत्रपिंड प्रत्यारोपण, मेंदू व मज्जासंस्था आणि कर्करोगावरील उपचारासाठी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केलेली होती. आता शासनाने दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील (वार्षिक रुपये १ लक्ष पर्यंत उत्पन्न असलेल्या) शिधापत्रिकाधारक कुटुंबासाठी अधिक आजारांचा समावेश असणारी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केलेली आहे. त्यामुळे या विभागाच्या दिनांक ३१ मे, २०११ च्या शासन निर्णयामध्ये केलेल्या तरतुदीनुसार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी ज्या दिनाकांस सुरु होईल त्या दिनांकास संबंधीत जिल्हयामध्ये कार्यरत असलेली जीवनदायी आरोग्य योजना आपोआप बंद होईल. सदर योजना उर्वरित २७ जिल्हयांमध्ये दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ पासून सुरु करण्यात आलेली आहे. यास्तव, जीवनदायी आरोग्य योजनेतील रुग्ण राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये उपचारासाठी समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. सदर रुग्णांचे प्रि-ऑथोरायझेशन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या संबधीत रुग्णालयांमध्ये तात्काळ करण्यात यावे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु झालेली असल्यामुळे जुनी जीवनदायी आरोग्य योजना बंद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. सं. फडतरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

महालेखापाल (लेखा परीक्षा ) व (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर

अपर मुख्य सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई

संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

सहसंचालक/उप संचालक, आरोग्य सेवा , परिमंडळे (सर्व)

जिल्हाधिकारी (सर्व)

जिल्हा शल्यचिकित्सक, (सर्व)

सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये (संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्या मार्फत)

जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

सर्व संबधीत रुग्णालये (संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांच्या मार्फत)

सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

सार्वजनिक आरोग्य विभाग (सर्व कार्यासने व शाखा) मंत्रालय, मुंबई -३२

निवड नस्ती.